मधुर संदेश

लेखक
इल्तिफात अहमद
भाषांतर
मुबारक हुसेन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

मनुष्य एक समाजप्रिय प्राणी आहे. समाज त्याची गरज आहे. समाज संघटित नसेल तर जीव, संपत्ती, मान, अब्रू सर्व काही संकटात पडतात. म्हणून एक संघटित समाज माणसाची गरज आहे. समाज संघटित करण्यासाठी काही कायदे व नियम आवश्यक आहेत. त्या कायदे व नियमांना मराठी व हिंदी भाषेत 'जीवनसिद्धान्त', उर्दू भाषेत 'निजामे जिंदगी', इंग्रजी भाषेत 'वे ऑफ लाइफ' (Way of Life) अथवा 'सोशल ऑर्डर' (Social Order) आणि अरबी भाषेत 'दीन' असे म्हणतात.

जीवनमार्ग (दीन) समाजाची सर्वात मोठी आवश्यकता आहे. तो चांगला असेल तर संपूर्ण समाज चांगला असतो. तो बिघडला तर संपूर्ण समजा बिघडतो. चांगला जीवनमार्ग कसा बनेल? कोण बनवील? या संबंधाने राजकारणपंडितांचे म्हणणे आहे की जो कोणता जीवनमार्ग बनवील त्यासाठी तीन अटी आवश्यक आहेत.

१) **निष्पक्षपणा (Impartiality)** - कायदा व नियम बनविणारा निष्पक्ष नसेल तर जीवनमार्ग कधीही चांगला बनणे शक्य नाही. परंतु दुर्दैव असे की लोकांत एकसुद्धा निष्पक्ष मनुष्य नाही. अशाप्रकारे मनुष्य पहिली अट पूर्ण करू शकत नाही.

२) **मानसशास्त्राचे ज्ञान** - जीवनमार्ग अथवा दीन छंद म्हणून बनत नाही, तर गरजेप्रमाणे बनतो. म्हणून जोपर्यंत कोणी मानवाचे मानसशास्त्र, त्याच्या गरजा आणि त्याच्या प्रश्नांना पूर्णत: जाणत नाही. तोपर्यंत तो बिनचूक जीवनमार्ग बनवू अथवा आणू शकत नाही. या बाबतीतसुद्धा मनुष्य यशस्वी ठरलेला नाही.

३) **भविष्याचे ज्ञान** - जीवनमार्गाची आखणी आजच्या प्रश्नांना पुढे ठेऊन केली जाते. पण हा जीवनमार्ग तर उद्या अमलात येणार आणि उद्याच्या बाबतीत माणसाला कोणतेही ज्ञान नाही.

अशाप्रकारे जीवनमार्ग अथवा दीन बनविण्यासाठी मनुष्य तीन अटीपैकी एकसुद्धा पूर्ण करीत नाही. परंतु ईश्वर या तिन्ही अटी उत्तम प्रकारे पूर्ण करतो. ईश्वराच्या दृष्टीत काळे गोरे सर्व समान आहेत. ईश्वराशिवाय इतर कोणीही निष्पक्ष असूच शकत नाही. दुसऱ्या अटीविषयी असे की खुद्द ईश्वरानेच मानवाची निर्मिती केली आहे. त्याच्या मानसशास्त्राला जर तोच समजत नसेल तर अन्य कोण समजणार? आणि तिसऱ्या अटीविषयी सर्वांना माहीत आहे की भविष्याचे ज्ञान फक्त ईश्वरालाच आहे. म्हणून

सर्वोत्तम जीवनमार्ग केवळ ईश्वरच बनवू शकतो. परंतु अनेक लोक आज ईश्वरालाच मानण्यास तयार नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की हे संपूर्ण ब्रह्मांड स्वत: बनलेले आहे आणि स्वत: चालते. याचा कोणीही निर्माता नाही की चालविणाराही नाही. परंतु वैज्ञानिकांना हे चांगल्या प्रकारे माहीत आहे की जग नेहमी मानत आलेले आहे की ब्रह्मांडाचा कोणीतरी निर्माता आहे. म्हणून जोपर्यंत आम्ही आमचे म्हणणे शास्त्रीय प्रमाणाने सिद्ध करीत नाही तोपर्यंत जग आमचे म्हणणे मानण्यास तयार होणार नाही.

याकरिता सर्वांत पहिला शास्त्रज्ञ जो मैदानात उतरला तो डाल्टन होता. त्याने शास्त्रीय पुराव्यानिशी सिद्ध केले की संपूर्ण ब्रह्मांड ज्यात सूर्य, चंद्र, आकाशगंगा (Galaxy), नीहारिका (Nebula), मानव, जनावरे सर्व आहेत, हे सर्वच्या सर्व परमाणू (Atom) पासून बनलेले आहेत. दुसरा शास्त्रज्ञ पुढे आला त्याने प्रयोगाने सिद्ध केले की परमाणू अमर आहे. त्याने बर्फाचा एक तुकडा टेबलावर ठेवला. थोड्याच वेळात तो तुकडा नाहीसा झाला. बर्फाचा तुकडा तर संपला; परंतु तो तुकडा ज्या अणुपासून बनलेला होता, ते अद्याप जिवंत आहेत. त्यांनी आपले रूप बदलले आहे. प्रथम ते घन रूपात होते. आता ते द्रव रूपात आहेत. पाणी गरम केल्यास थोड्या वेळाने संपते; परंतु ज्या परमाणूपासून पाणी बनले होते ते अद्याप अस्तित्त्वात आहेत. पाणी प्रथम द्रव रुपात होते आणि आता बाष्प रुपात आहे. अशाप्रकारे परमाणू अमर आहे. जी वस्तू मरत नाही ती जन्मसुद्धा घेत नाही. म्हणून हे ब्रह्मांड जन्मलेही नाही आणि मरणारसुद्धा नाही. ते सदैव राहिले आहे आणि सदैव राहील. या ब्रह्मांडाचा कोणीही निर्माता नाही आणि निर्मात्याची गरजसुद्धा नाही.

या दोन्ही शास्त्रज्ञांच्या प्रयोगाने संपूर्ण जगात खळबळ उडाली. टाकली बहुतेक सुशिक्षित मंडळींनी हे मान्य केले की खरोखरच या ब्रह्मांडाचा कोणी निर्माताही नाही की ते चालविणारासुद्धा नाही. परंतु एक लहानसा गट अवश्य असा होता ज्याला या शास्त्रज्ञांची मते अजिबात मान्य नव्हती. परंतु या बिचाऱ्यापाशी या मतांचा विरोध करण्याची शक्ती नव्हती. तथापि त्यांनी हलक्या आवाजात त्या शास्त्रज्ञांना विचारले की जर हे ब्रह्मांड स्वत: बनलेले आहे आणि याचा निर्माणकर्ता व चालविणारा कोणीच नसेल तर हे सूर्य, चंद्र, तारे वगैरे कसे बनले आणि ते घड्याळातील भागाप्रमाणे कसे चालत आहेत? उत्तर मिळाले की जेव्हा एखादी वस्तू वर्तुळाकार फिरते तेव्हा तिच्या प्रत्येक कणांत एक शक्ती निर्माण होते जी त्या कणाला केंद्रापासून लांब फेकते. याच शक्तीला शास्त्रात अपकेंद्रकीय शक्ती (Centrifugal Force) म्हणतात. वाफेचा एक गोळा नाचत होता. याच सिद्धान्तानुसार त्याच्यातील एक तुकडा निसटला आणि पृथ्वी

बनली. दुसरा तुकडा निसटला आणि गुरु ग्रह बनले. अशाप्रकारे अनेक ग्रह बनले. हा गोळा नाचत होता म्हणून यापासून निघालेले ग्रह गोळ्याच्या सभोवती भ्रमण करू लागले आणि अशाप्रकारे संपूर्ण सौर-मंडळ बनले. याच्या निर्मितीसाठी कोणत्याही निर्मात्याची गरज नाही.

त्यांना विचारले गेले की आमच्या पृथ्वीपासून सूर्य किती अंतरावर आहे? उत्तर मिळाले, '९३ दशलक्ष मैल'. पुन्हा विचारले की ९३ दशलक्ष मैलच का? उत्तर मिळाले की, जो तुकडा निसटला त्यात योगायोगाने इतकेच अपकेंद्रीय बळ होते की ९३ दशलक्ष मैलावर जाऊन तो थांबला. हा केवळ योगायोग होता की इतकेच अपकेंद्रीय बळ निर्माण झाले. असेही शक्य होते की अपकेंद्रीय बळ फार जास्त निर्माण झाले असते आणि पृथ्वी आपल्या हल्लीच्या अंतरापेक्षा दुप्पट अंतरावर जाऊन थांबली असती. असेही शक्य आहे की पृथ्वी वर्तमान अंतराच्या निम्म्या अंतरावर जाऊन थांबली असती. परंतु दोन्ही स्थितीत यापेक्षा मोठे भयंकर परिणाम समोर आले असते आणि सूर्यापासून जवळ असल्यामुळे सूर्याची किरणे इतकी प्रखर झाली असती की आम्ही होरपळून मेलो असतो. जर अंतर दुप्पट असते तर आम्ही सूर्यापासून इतके दूर गेलो असतो की थंडीच्या दिवसांत पृथ्वी गोठून बर्फ झाली असती. आम्ही सर्वजण मृत्यूमुखी पडलो असतो. अंतराचा विचार करून पाहिले तर स्पष्टपणे हे लक्षात येते की याच्या पाठीमागे एक मेंदू आहे, ज्याने पृथ्वीच्या अंतराला आवश्यकतेनुसार ठेवले जेणेकरून माणसाने त्यावर आरामशीर रहावे. अंतर कमी असते तरीसुद्धा आम्ही मेलो असतो आणि अंतर जास्त असते तरीसुद्धा आम्ही मेलो असतो. सर्व अवस्था दर्शवितात की ब्रह्मांड बनविणारा एक आहे आणि त्याने पृथ्वीचे अंतर बरोबर तितकेच ठेवले आहे जितक्यात आम्ही आरामशीर राहू शकावे.

प्रश्न केला गेला की आपल्या पृथ्वीचा आकार काय आहे? उत्तर मिळाले की याचा अर्धव्यास ४००० मैल आहे. मग विचारले गेले की ४००० मैलच का? याच्यापेक्षा कमी अथवा अधिक का नाही? उत्तर मिळाले की, ब्रह्मांडाचा कोणी निर्माता तर नाही; परंतु योगायोगाने इतकीच माती निसटली आणि त्याने ही पृथ्वी बनली. परंतु असेसुद्धा शक्य होते की माती कमी निसटली असती आणि पृथ्वीचा आकार अर्धा झाला असता आणि असेही शक्य होते की जास्त माती निसटली असती आणि दुप्पट आकार झाला असता. पण दोन्ही अवस्थेत महाभयंकर परिणाम समोर आले असते. जर पृथ्वीचा आकार निम्मा झाला असता तर पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ती एकचतुर्थांश उरली असती आणि हे वायुमंडळ जे गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे पृथ्वीशी

चिकटले आहे, गुरुत्वाकर्षण शक्ती कमी होताच ते क्षितिजाकडून पळून गेले असते आणि हवेविना कोण जिवंत राहू शकता? तास दोन तास आम्ही जिवंत पण राहिलो असतो; पण त्यापूर्वी एक संकट आणखी आले असते. प्रत्येक दिवशी दोन अब्ज उल्का आमच्या पृथ्वीच्या कक्षेत प्रवेश करतात. त्यांची गति ३० ते ४० मैल प्रत्येक सेकंदाला असते. ज्या हवेशी घर्षण झाल्यामुळे जळून राख बनतात. केवळ त्यांची राखच पृथ्वीपर्यंत पोचते. हवा नसती तर त्या दोन अब्ज उल्कांचा असा भयंकर वर्षाव झाला असता की पृथ्वीवर कोणीही जिवंत उरला नसता. पृथ्वीचा आकार दुप्पट असता तर गुरुत्वाकर्षण शक्ती चौपट झाली असती आणि आमचे वजन इतके जास्त बनले असते की आम्हाला चालणे-फिरणे अशक्य झाले असते. हवेचा दाब इतका जास्त झाला असता की आमच्या हाडा-फासळ्यांचा चक्काचूर झाला असता, पाण्याची वाफ झाली नसती आणि पाऊस पडला नसता. या सर्व गोष्टी दर्शवितात की ब्रह्मांड निर्माण करणारा अवश्य कोणीतरी आहे; ज्याने आपल्या योजनेप्रमाणे त्याचा आकार तितकाच ठेवला जितक्यात आम्ही सुखा-समाधानाने राहू शकू, आकार कमी असता तर आम्ही मेलो असतो आणि आकार मोठा झाला असता तरीसुद्धा आम्ही मेलो असतो.

ज्या वायुमंडळाने आमच्या पृथ्वीला घेरले आहे, त्या घेऱ्यात अनेक प्रकारचे गॅस आहेत. विचारले गेले की यात कोणकोणते गॅस आहेत? उत्तर मिळाले की ऑक्सिजन, नायट्रोजन, कार्बनडाय ऑक्साइड वगैरे अनेक गॅस आहेत. यात इतके गॅस का आहेत? उत्तर मिळाले की जो वायू येथे आला होता, त्यात हे गॅस अगोदरच होते. प्रश्न केला गेला की जर यात ऑक्सिजन नसते तर काय झाले असत? उत्तर मिळाले की तर आम्ही सर्व मेलो असतो. कारण ऑक्सिजनविना कोणीही जिवंत राहू शकत नाही.

यावरून हे स्पष्ट कळते की ब्रह्मांड निर्माण करणारा अवश्य एक आहे. त्याने पृथ्वीचे अंतरसुद्धा तितकेच ठेवले जेणेकरून मनुष्य जिवंत राहू शकेल पृथ्वीचा आकारसुद्धा तितकाच ठेवला की माणसाने पृथ्वीवर सुखाने रहावे. वायुमंडळात विभिन्न गॅसचे प्रमाण अशाप्रकारे ठेवले की समस्त सजीवांना चांगल्या प्रकारे जीवनवायू मिळावा. एकीकडे या सर्व व्यवस्था हेच दर्शविते की ब्रह्मांडाचा निर्माता कोणीतरी अवश्य आहे आणि दुसरीकडे गुरुत्वाकर्षण सिद्धान्ताने (Quantum Theory) डाल्टन व लेन्डार्ट यांच्या सिद्धान्तांना चुकीचे ठरविले आहे आणि दाखवून दिले आहे की अणू अमर नाही.

या प्रश्न व उत्तरांनी डोळ्यांसमोरून ते सर्व पडदे दूर केले जे या ब्रह्मांड व त्याच्यात होणाऱ्या बदलासंबंधी पडले होते. जगाची अशी धारणा झाली होती की हे सर्वकाही योगायोगामुळे घडले आहे आणि ब्रह्मांडाला निर्माण करणारा कोणी नाही की

त्याला चालविणारासुद्धा कोणी नाही. परंतु आता सर्व गैरसमजुती दूर झालेल्या आहेत व या प्रश्नोत्तराने आमचे डोळे उघडले आहेत. आता आम्ही पूर्ण विश्वासाने म्हणू शकतो की या ब्रह्मांडाचा निर्माणकर्ता एक आहे आणि तोच ते कौशल्याने व्यवस्थित चालवीत आहे आणि ब्रह्मांडात एक जबरदस्त योजना कार्यरत आहे.

आज त्या लोकांच्या बुद्धिमत्तेवर हसू येते, जे असे म्हणत होते की ब्रह्मांड न बनविता बनले आहे आणि कुणी न चालविता ते चालले आहे. आता क्वचितच एखादा सुशिक्षित मनुष्य असेल जो अशा मूर्खपणाच्या गोष्टी करीत असेल. शास्त्राचा एक नियम आहे की वस्तुला उष्णता दिल्यास ती प्रसरण पावते आणि थंड केल्यास ती आकुंचन पावते; परंतु आता हे कळले आहे की याच्याशी कोणताही जोडलेला नियम नाही तर ब्रह्मांडाच्या पाठीमागे एक जबरदस्त विवेक व योजना कार्यरत आहे. म्हणून हाच उष्णतेने प्रसरण पावण्याचा व थंडीने आकुंचन पावण्याचा नियम जेव्हा पाण्याला लागू करण्यात येतो तेव्हा खरोखरच पाणी गरम केल्यास प्रसरण पावते आणि थंडीने आकुंचन पावते. परंतु उणे चार डिग्री सेल्सियसवर उष्णतामान पोचल्यास हाच नियम पूर्णपणे उलट होतो. पाणी आकुंचन पावण्याऐवजी प्रसरण पावते. यावरून लक्षात येते की याच्या पाठीमागे श्रेष्ठविवेक काम करीत आहे. जर हा नियम उलटला नसता तर पाण्यातील सर्व जीव-जंतु मेले असते. याच त्या गोष्टी आहेत, ज्यांच्यामुळे विवश होऊन एका शास्त्रज्ञाला म्हणावे लागले, "There is a mind behind this." (याच्या पाठीमागे एक बुद्धी काम करीत आहे.)

आता मनुष्य या गोष्टीशी सहमत आहे की या ब्रह्मांडाचा बनविणारा कोणीतरी आहे. हा विचार मानव जीवनासाठी फार महत्त्वपूर्ण आहे आणि या विचारधारेने सर्व लोकांना एका प्लॅटफॉर्मवर आणले आहे. आज जग हे मान्य करीत आहे की या ब्रह्मांडाची निर्मिती करणारा एक आहे, या निर्मात्याला लोक वेगवेगळ्या नावाने साद घालतात. कोण त्याला अल्लाह म्हणतो, कोणी गॉड (God) म्हणतो, तर कोणी ईश्वर; परंतु मोठ्या आनंदाची गोष्ट अशी की सर्वांचा अर्थ तोच एक निर्माता होय. हे मानवाचे विश्व-समाज बनविण्याकडे पडलेले पहिले पाऊल होय.

केवळ ईश्वराला मानण्याने मानवजीवनात कोणतीही सुधारणा तोपर्यंत होऊ शकत नाही, जोपर्यंत लोक त्या ईशआदेशांचे पालन करण्यास तयार होत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत आजचे सुशिक्षित जग हे जाणते की ईश्वराला मानणे आणि त्याच्या आदेशानुसार चालण्यास तयार नसणे ही मूर्खपणाची गोष्ट आहे.

ईशआदेश

संपूर्ण ब्रह्मांडात सूर्य, चंद्र, तारे, आकाशगंगा आणि नीहारिका असोत अथवा मनुष्य, जनावरे अथवा झाडे असोत; सर्व ईश्वराने निर्माण केलेले आहेत. परंतु यात सर्वश्रेष्ठ मनुष्यच आहे. म्हणून त्याला ईश्वराने सुंदर शरीर व चांगल्या योग्यता प्रदान करून त्याला या पृथ्वीवर बसविले आणि त्याच्या गरजेच्या सर्व वस्तूंचा भांडार येथे एकत्रित केला. माणसाला पाच इंद्रिय देऊन या धरातलावर पाठविले की त्याने बुद्धी व इंद्रियांच्या साहाय्याने नवनवीन वस्तूंचा शोध लावावा व त्याचा लाभ घ्यावा. म्हणून ईश्वराने त्याला या क्षेत्रात केवळ पैगंबर अथवा ग्रंथ देण्याचीच आवश्यकता समजली नाही तर ज्ञानात्मक गोष्टीसुद्धा या पृथ्वीवर त्याला विचार व चिंतन करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या. उदाहरणार्थ हे ब्रह्मांड काय आहे? ते कसे बनले व कसे चालते? मनुष्य कोठून आला? त्याचा ब्रह्मांडाशी व आपल्यासारख्या माणसांशी काय संबंध आहे? वगैरे, या ज्ञानाशिवाय मनुष्य खऱ्या अर्थी मनुष्य बनू शकत नाही. ईश्वराने दिलेल्या वस्तूंचा तो पूर्णपणे लाभही घेऊ शकत नाही. उलट त्याचे इतके पतन होईल की तो स्वत:साठीच घातक ठरेल. या सर्व प्रश्नांचे अचूक व सर्वसंमत उत्तर मानवाच्या डोक्यात नाही. कल्पना असतील व आहेतसुद्धा. परंतु या कल्पना अवास्तविकच असतात. त्या केवळ अंदाजावर आधारित असतात. या प्रश्नांचे खरे उत्तर तर केवळ ईश्वराजवळच आहे. परंतु त्याने कधी असे केले नाही की एक पुस्तक छापून प्रत्येक माणसाच्या हातात एक एक प्रत दिली आणि सांगितले की याचे वाचन करून समजून घ्या. ईश्वराने या ज्ञानाला मानवापर्यंत पोचविण्यासाठी पैगंबरांना माध्यम बनविले आणि पैगंबरांना आदेश दिला की त्यांनी हे ज्ञान मानवापर्यंत पोचवावे. ईश्वराने हे ज्ञान 'वही' (ईशआदेश) द्वारा पैगंबरांपर्यंत पोचविले आणि त्यांच्यावर जबाबदारी टाकली की त्यांनी हे ज्ञान मानवापर्यंत पोचवावे.

पैगंबरांचे काम केवळ इतकेच नाही की त्यांनी हे ज्ञान लोकांपर्यंत पोचवावे. त्यांनी हेसुद्धा सांगावे की त्या ज्ञानानुसार ईश्वर व मानव आणि मानवाचे मानवाशी कसे संबंध असावेत? हे ज्ञान कोणत्या प्रकारची विचारसरणी, नैतिक दृष्टिकोन आणि संस्कृतीची अपेक्षा करते? या ज्ञानानुसार मानव समाजाचा आर्थिक, राजनैतिक, सामाजिक, नैतिक व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन कसा असणे आवश्यक आहे ?

पैगंबर केवळ पूजापाठ व रीतिरिवाज (Worship and Rituals) घेऊन येत नाही ज्याला हल्लीच्या भाषेत धर्म अथवा मज़हब (Religion) म्हणतात, तर तो एक संपूर्ण जीवनमार्ग घेऊन येतो ज्याला अरबी भाषेत 'दीन' (Way of Life) असे म्हणतात.

जेव्हा एखाद्या देशात दीन अथवा जीवनमार्ग स्थापित होतो तेव्हा तेथील संपूर्ण जीवन (व्यक्तिगत व सामूहिक) दीनच्या ताब्यात येते. धर्माचा मनुष्याशी व्यक्तिगत संबंध आहे. ज्याला हवे त्याने मानावे आणि ज्याची इच्छा नसेल त्याने मानू नये. किती तरी ज्या लोकांची अशी भूमिका आहे की, ते धर्म मानीत नाही, धर्म तर एक सोंग आहे असे ते म्हणतात. जे धर्म मानतात त्यांचीसुद्धा स्थिती अशी आहे की जर त्यांनी इच्छिले तर पूजा-अर्चा करावी आणि इच्छा नसेल तर करू नये, कोणीही विचारणारा नाही. परंतु दीन अथवा जीवनमार्ग एक आवश्यकता आहे. आपण ईश्वर मानीत नसाल आणि त्याने पाठविलेला जीवनमार्ग स्वीकारणार नसाल तर स्वीकारू नका. परंतु आपणास स्वत:ला एक दीन बनवावा लागेल, जसा दीन राजेशाही, दीन कम्युनिजम अथवा दीन पूंजीवादी, दीन प्रजावंत वगैरे.

ईश्वराची अशी योजना आहे की संपूर्ण मानवजगताला एक ईश्वर, एक पैगंबर आणि एक ईशआदेशाद्वारे सर्वांचा एक मानवसमाज बनवावे. जेणेकरून दररोजचे आपापसातील संघर्ष समाप्त व्हावेत. प्रारंभी असे करणे शक्य नव्हते. दळणवळणाची साधने चांगली नव्हती. कोठे दोन देशांदरम्यान समुद्र होते, तर कोठे वाळवंट आणि कोठे पर्वत. म्हणून ईश्वराने आपले आदेश विभिन्न पैगंबर (प्रेषित, ईशदूत) द्वारे विभिन्न देशांत पाठविले. प्रत्येक पैगंबर ईशआदेश घेऊन आला आणि त्याने तो आदेश आपल्या देशाच्या भाषेत प्रस्तुत केला.

जेव्हा एखाद्या देशात पैगंबरांने ईशआदेशाची अंमलबजावणी सुरू केली, तेव्हा तेथील चलाख लोकांनी ओळखले की जर येथे ईशआदेश चालू लागला तर सर्वजण ईश्वरासमोर नतमस्तक होतील. मग माझ्यापुढे कोण नतमस्तक होईल? सर्व लोक ईश्वराचा आदेश मानतील तर माझी आज्ञा कोणावर चालेल? मी ईशआदेश लागू होऊ देणार नाही. पैगंबर स्वर्गवासी झाल्याबरोबर या चलाख मंडळींनी ईशआदेशातून सामूहिक जीवनासंबंधी असलेले सर्व आदेश काढून टाकले. फक्त पूजा-अर्चा आणि रूढीपरंपरांच्या आदेशांना निरुपद्रवी म्हणून राहू दिले आणि तेथे आपले राज्य स्थापन केले. जनतेने ईशआदेशातील पूजा-पाठाच्या आदेशांचे संकलन करून एका धर्माची स्थापना केली. अशाप्रकारे ईशआदेश येत राहिले आणि ते स्वार्थी लोकांद्वारे बिघडविले जात राहिले. या बिघाडाबरोबरच एका नवीन धर्माची निर्मितीसुद्धा होत राहिली. अशाप्रकारे अनेक धर्म व मत तयार होत गेले. जसे हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन धर्म या सर्व धर्मांत जीवनमार्ग (दीन) नाही.

अंतिम पैगंबर

जेव्हा जगात प्रगती झाली आणि आवागमनाची साधने विपुल झाली तेव्हा ईशआदेश व सिद्धान्तांच्या प्रचारासाठी संपूर्ण जगासाठी एक शेवटचा पैगंबर पाठविण्याची योजना करण्यात आली. या योजनेत दोन गोष्टींवर विशेष लक्ष देणे आवश्यक होते की जेव्हा संपूर्ण जगासाठी एकाच पैगंबरांला पाठवावयाचे होते तेव्हा त्याचे प्रचारकेंद्र आशिया, युरोप आणि आफ्रिका यापैकी कोठे ठेवण्यात यावे? म्हणून अंतिम पैगंबरांचे प्रचारकेंद्र अशा ठिकाणी ठेवण्यात आले जेथून तिन्ही खंडांत प्रचार करता येईल. मध्यपूर्व (Middle East) ते क्षेत्र आहे जेथून तिन्ही खंडांत प्रचार होऊ शकतो. कारण तेथे तिन्ही खंडांचा संगम आहे. जेव्हा जेव्हा एखाद्या देशात पैगंबर ईशआदेश आणि सिद्धान्तांच्या प्रचारासाठी जात तेव्हा तेथील राजा सावध व्हायचा आणि तो समजत असे की जर ईशसिद्धान्त देशात प्रस्थापित झाला तर माझे सिंहासन राहणार नाही. म्हणून तो लगेच मैदानात उतरत असे आणि एखाद्या पैगंबरांला जिवंत जाळीत असे किंवा कोणा पैगंबरांला करवतीने कापीत असे. म्हणून प्रचारकेंद्रासाठी अशा स्थानाची गरज होती जेथे राजेशाही (Kingship) नसेल.

त्यावेळी अरबस्थानच केवळ मध्यपूर्वेतील एकमेव असा देश होता, जेथे राजेशाही म्हणून काहीही अस्तित्त्वात नव्हते. संपूर्ण देशात लहान लहान टोळ्या पसरल्या होत्या आणि प्रत्येक टोळीच्या सरदारावर आपल्या लोकांची जबाबदारी असे. ईश्वराने आपले अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांना अरबस्थानाच्या प्रसिद्ध शहर मक्केत जन्मास घातले. पैगंबर मुहम्मद (स.) मक्केच्या सर्वात मोठा कबिला कुरैशच्या सरदाराच्या घरी जन्मले. कुरैशपैकी कोणतीही व्यक्ती पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विरोध करू शकत नव्हती. कारण ते या कबील्याच्या सरदाराच्या घरी जन्मले होते. दुसऱ्या कबिल्यांचे लोक त्यांना काही बोलू शकत नव्हते, कारण त्यांचा कबिला सर्वांत मोठा होता. अशाप्रकारे त्यांना ईशजीवनमार्गाप्रमाणेच तेवीस वर्षात संपूर्ण अरबस्थानात व्यक्ती, समाज व राज्य या तिन्हींना चांगला आकार देण्याची संधी उपलब्ध झाली.

ईशग्रंथ

पूर्वीच्या पैगंबरांना ईश्वराकडून जे ग्रंथ मिळाले होते, त्यात लोकांनी कमी-जास्त करून निरुपयोगी करून टाकले होते. अंतिम पैगंबरांना ईश्वराने 'पवित्र कुरआन' ईशग्रंथ म्हणून दिला होता आणि त्या ग्रंथाच्या सुरक्षेची जबाबदारी खुद्द ईश्वराने घेतली. कुरआनची सुरक्षा अशाप्रकारे केली की कुरआन एक पूर्ण ग्रंथाच्या रूपात एकाच वेळी दिला नाही, तर थोडा-थोडा करून 'वही' (ईशआदेश) द्वारा पाठविला गेला. एका वेळी थोड्या आयती (वचने) 'वही'द्वारे पाठविली जात असे. पैगंबर आपल्या कारकुनाकडून लिहून घेतल्या, ज्यांना लिहिता-वाचता येत होते, ते पैगंबरांना विचारून लिहून घेत असत. ज्यांना लिहिता-वाचता येत नसे ते तोंडपाठ करीत असत. अशाप्रकारे कुरआन थोडा थोडा अवतरत राहिला आणि पैगंबर आपल्या कारकुनाकडून लिहवून घेत असत.

अशाप्रकारे संपूर्ण कुरआन तेवीस वर्षांत अवतरला आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तो पूर्णत: लिहवून सुरक्षित केला. सुशिक्षित लोकसुद्धा जे त्यांच्याबरोबर लिहून घेत असत, त्यांच्याजवळ लिखित रूपात संपूर्ण कुरआन होते. त्याशिवाय हजारो लोक असे होते, ज्यांनी संपूर्ण कुरआन तोंडपाठ केले होते. बाकीचे जितके मुस्लिम होते त्या सर्वांना अर्धे किंवा पाऊण कुरआन पाठ होते; कारण नमाजमध्ये कुरआन पठन करणे आवश्यक असते. कागदाचीसुद्धा निर्मिती सुरू झाली होती. कुरआनच्या लाखो प्रती तयार होऊन जगाच्या कानाकोपऱ्यात पोचल्या होत्या. अशा कुरआनमध्ये बरे कोणाला परिवर्तन करणे शक्य होते, कारण त्याच्या सुरक्षेची विशेष व्यवस्था केली गेली होती. रमजान महिन्यात प्रत्येक मस्जिदमध्ये एक हाफ़ीज (असा मनुष्य ज्याने संपूर्ण कुरआन तोंडपाठ केले असेल) कुरआनचे पठण करतो आणि लोक त्यांच्या पाठीमागे कुरआन ऐकतात. अशा स्थितीत बरे कोण म्हणू शकतो की कुरआनमध्ये काही बदल झाला आहे अथवा होऊ शकतो. वाटल्यास कोणत्याही माणसाने जगातील वेगवेगळ्या ठिकाणाहून कुरआनच्या प्रती गोळा कराव्यात आणि त्यांना अक्षरश: पडताळून पाहावे. त्याला आढळेल की सर्व प्रती अक्षरश: एकसमान आहेत.

कुरआन ईशग्रंथ आहे

यात कोणतीच शंका नाही की कुरआन पूर्णपणे सुरक्षित आहे. १५०० वर्षांपूर्वी तो जसा अवतरला होता, तसाच तो आजसुद्धा आहे. त्याच्यात कोठेही आणि कसलेही परिवर्तन झालेले नाही. परंतु जर तो ईशग्रंथ नसेल तर त्याचे काहीही महत्त्व नाही. कारण आजच्या माणसाचे ज्ञान १५०० वर्षांपूर्वीच्या माणसापेक्षा अधिक आहे. या ग्रंथाचे सर्व महत्त्व यातच आहे की हा ईशग्रंथ आहे. अल्लाहने (ईश्वराने) सुद्धा कुरआनमध्ये जागोजागी हेच म्हटले आहे की कुरआन ईशग्रंथ आहे. तो पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्वत: लिहिलेला नाही. कुरआनमध्ये आहे,

''या ग्रंथाचे अवतरण अल्लाहकडून आहे जो प्रभावशाली आणि तत्त्वदर्शी आहे.'' (दिव्य कुरआन, ३९ : १)

''आम्ही हा कुरआन तुमच्यावर अशासाठी अवतरित केला नाही की तुम्ही संकटात पडावे. हा तर एक अनुस्मारक आहे त्या प्रत्येक व्यक्तीसाठी जे भय बाळगते.तो तर अवतरविला गेला आहे त्या सत्तेकडून ज्याने निर्माण केले आहे पृथ्वीला आणि उंच आकाशांना.'' (दिव्य कुरआन, २० : २-४)

''काय हे म्हणतात की या व्यक्तीने कुरआनची स्वत: रचना केली आहे? खरी गोष्ट अशी आहे की हे ईमान आणू इच्छित नाहीत. जर हे आपल्या कथनात खरे असतील तर त्यांनी अशी वाणी बनवून आणावी.'' (दिव्य कुरआन)

''जेव्हा यांना आमच्या स्पष्ट गोष्टी ऐकविल्या जातात तेव्हा ते लोक ज्यांना आमच्याशी भेट होण्याची आशा नाही ते म्हणतात की, याच्याऐवजी एखादे अन्य कुरआन आणा अथवा याच्यातच काही सुधारणा करा. हे पैगंबर! त्यांना सांगा, माझे हे काम नव्हे की आपल्याकडून मी काही परिवर्तन करावे. मी तर केवळ त्या 'वही'चा (अल्लाहच्या आदेशाचा) अनुयायी आहे जी माझ्याकडे पाठविली जाते. जर मी आपल्या अल्लाहचे आदेश पाळले नाही तर मला एक भयंकर दिनाच्या यातनेचे भय आहे आणि म्हणा जर अल्लाहची इच्छा नसती तर मी हा कुरआन तुम्हाला कधीच ऐकविला नसता आणि अल्लाहने तुम्हाला हे कळूदेखील दिले नसते. अखेर यांना विचारा की मी तुमच्यात एक आयुष्य घालविले आहे, काय तुम्ही बुद्धीचा प्रयोग करीत नाही?'' (दिव्य कुरआन, १० : १५-१६)

पैगंबर मुहम्मद (स.) यांना कुरआन ईशग्रंथाच्या रूपात दिले गेले होते. ही काही जगावेगळी गोष्ट नाही. याच्या अगोदर अनेक पैगंबर आले आहेत आणि त्यांना

ईश्वराकडून ईशग्रंथ दिले गेले आहेत, ज्यांना जग मानते. उदाहरणार्थ, आदरणीय मूसा (अ.) यांना 'तौरात' ग्रंथ दिला गेला, आदरणीय इसा (अ.) यांना 'इंजिल' आणि आदरणीय दाऊद (अ.) यांना 'जबूर' दिला गेला. हिंदू धर्मात मानले जाते की वेदसुद्धा ईशग्रंथ असून ते सर्वांत प्राचीन ग्रंथ आहेत.

जेव्हापासून मानवाने या पृथ्वीवर पाऊल टाकले आहे तेव्हापासून पैगंबर ईश्वराकडून ईशग्रंथ आणीत राहिले आहेत. परंतु स्वार्थी लोक त्यात फेरबदल करित राहिले. ईशग्रंथ जितका पुरातन असेल तितका त्यात बिघाड आलेला असतो. वेदांत परिवर्तनानंतरसुद्धा काही गोष्टी अशा आढळतात, ज्यावरून हे ज्ञात होते की वेदसुद्धा ईशग्रंथ असावेत. एका पंडिताने वेदांसंबंधी म्हटले आहे, "एक रत्ती साखरेत अनेक शेर मीठ मिश्रित झाले आहे."

हल्ली एखाद्या भागाच्या लोकांचा इतिहास व संस्कृती जाणण्याची अनेक साधने आहेत. त्यांच्यापैकी एक नवीन साधन असे आहे की त्या वेळच्या शब्दांच्या विश्लेषणाने तेथील संस्कृतीविषयक माहिती प्राप्त होऊ शकते. यावर डॉ. भोलानाथ तिवारी, आचार्य क्षितिज मोहन सेन, गुणाकर मूळे वगैरेंनी बरेचसे संशोधन कार्य केले आहे. संस्कृतमध्ये एक शब्द आहे 'स्मशान' जो त्या जागेसाठी प्रयुक्त होतो जेथे प्रेतांचे दहन केले जाते. परंतु या शब्दाचे विश्लेषण केल्यास असे कळते की हा शब्द त्या जागेसाठी प्रयुक्त होतो, जेथे जमिनीत प्रेत पुरले जातात. डॉ. भोलानाथ तिवारी आपल्या पुस्तक 'शब्दों का जीवन' मध्ये म्हणतात की शब्द 'स्मशान' असे दर्शवितो की हिंदू पूर्वी प्रेतांचे दहन करीत नसत तर ते मुस्लिम व ख्रिश्चनाप्रमाणे पुरत असत. आचार्य क्षितिज मोहन सेन आपल्या पुस्तक 'भारतीय संस्कृती' मध्ये लिहितात, "स्मशान प्रेत पुरण्याची जागा होती, जाळण्याची नव्हे." आज आपल्या विद्वानांचे मत आहे की आर्य पूर्वी प्रेतांना पुरत असत, जाळण्याची पद्धत नंतर आली. वेदांवरूनदेखील प्रेतांना पुरण्याचे प्रमाण मिळते. प्रेत पुरताना मंत्र म्हटले जात होते. त्यापैकी हादेखील एक मंत्र आहे -

"तू आता पाहतोच परंतु यापुढे पुन्हा सूर्याचा प्रकाश पाहणार नाहीस. हे धरती! तू याला चोहो बाजूने गुंडाळून घे ज्याप्रमाणे आई आपल्या मुलाला चोहो बाजूने कापडात गुंडाळते."

अशाप्रकारे प्रेत पुरण्यात ज्यू-ख्रिश्चन आणि मुस्लिमांप्रमाणे वेदांतसुद्धा समानता आहे. शक्य आहे वेदसुद्धा ईशग्रंथ असतील. पवित्र कुरआन ईशग्रंथ असण्याची पुष्टी खुद्द तत्कालीन इस्लामविरोधकांच्या वक्तव्यावरून होते. विरोधक वरचेवर असेच म्हणत

असत की कुरआन ईशग्रंथ नव्हे. त्यांना हे चांगल्या प्रकारे माहीत होते की पैगंबर मुहम्मद (स.) यांना लिहिता-वाचता येत नाही. चाळीस वर्षे त्यांच्यामध्ये राहून इतक्या उच्च कोटीची अरबी भाषा त्यांच्या तोंडून कधी ऐकली नव्हती. ते हेदेखील म्हणू शकत नव्हते की कोण त्यांना हे शिकवितो कारण संपूर्ण अरबस्थानात कोणीसुद्धा इतकी चांगली अरबी भाषा बोलू शकत नव्हता. म्हणून कुरआनने या विरोधकांना आव्हान दिले आहे की जर कुरआन मानवाची निर्मिती आहे तर तुम्ही सर्व लोक मिळून संपूर्ण कुरआन तर शक्यच नव्हती, एक सूरह (अध्याय) तरी अशी बनवून दाखवा. परंतु आजतागायत हे आव्हान कोणीही स्वीकारले नाही. कुरआन फक्त आदेशांचा ग्रंथ नव्हे तर तो ज्ञानाचे भंडार आहे.

आता येथे मी काही अशा सत्य घटना देतो ज्याने पवित्र कुरआन ईशग्रंथ असण्याची पुष्टी खुद्द तत्कालीन इस्लामविरोधकांच्या वक्तव्यावरून होते.

अरबांना आपल्या अरबी भाषेच्या उच्च साहित्यिक स्तराबद्दल अभिमान होता. ते दुसऱ्यांना 'अजमी' अर्थात मूक म्हणत असत. हजप्रसंगी व यात्रेच्या काळात अरबीमध्ये विद्वतेची स्पर्धा होत असे. जो उत्तम अरबी साहित्य सादर करी त्याचे नाव होई आणि त्याला बक्षीस दिले जाई. तेथील सर्वश्रेष्ठ सन्मान असा होता की त्याची कविता रेशमी कापडावर सोन्याच्या दोऱ्याने लिहून 'काबागृहात' टांगली जात असे. अजूनपर्यंत हा पुरस्कार सात लोकांना मिळाला होता. त्यांना 'सब-ए-मोअल्लका' म्हटले जात असे. यांच्यातच तेथील प्रसिद्ध कवि 'लबीद'सुद्धा होता. एके दिवशी लबीदने आपली एक नवीन कविता लिहून काबागृहाच्या दारावर टांगली. एका मुस्लिमाला खोडसाळपणा सुचला आणि त्याने कुरआनमधील लहानसा सूरह 'अलकौसर' ज्यात केवळ तीन आयती (श्लोक) आहेत तो लिहून लबीदच्या कवितेशेजारी टांगला. एके दिवशी लबीदने पाहिले की माझ्या कवितेच्या शेजारी आणखी एक कविता टांगली आहे. चटकन तेथे गेला. ते वाचले आणि तो उद्गारला, ''हे मनुष्याचे वाक्य नव्हे.''

ही अरबस्थानच्या एका प्रसिद्ध कवीची ग्वाही आहे. विलास्टनने एक पुस्तक लिहिले आहे, ज्यात तो कुरआन ईशग्रंथ असल्याची पुष्टी करीत एका वस्तीच्या स्थितीचे वर्णन करतो की तेथील तरूण मंडळी कुरआन वाचून वाचून मुस्लिम होत होती. तेथील वयस्क मंडळी फार त्रस्त झाली होती. एके दिवशी सर्वजण या उद्देशाने एकत्र आले की वाडवडिलांच्या धर्माला वाचविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. असे ठरले की कुरआनच्या तोडीचाच एक आणखी कुरआन तयार करण्यात यावा. त्या वस्तीत 'इब्नुल मोकफ्फा' नावाचा एक विद्वान राहत असे. हे लोक त्याच्याकडे गेले

आणि एक दुसरा कुरआन लिहिण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली. त्यालासुद्धा आपल्या योग्यतेबद्दल फार गर्व होता. तो दोन अटीवर हे काम करण्यास तयार झाला. (१) काम कठीण असल्यामुळे ते पूर्ण करण्यासाठी एक वर्षाचा अवधी मिळावा आणि (२) या कामासाठी त्याला एकांत मिळावे. त्याच्या दोन्ही अटी मान्य केल्या गेल्या आणि वस्तीच्या बाहेर एक तंबू उभारला गेला आणि त्याच्या गरजेप्रमाणे त्याला आवश्यक वस्तू दररोज तेथे पोचविल्या जात असत. त्याने दुसरे कुरआन लिहिण्याचे काम सुरू केले. सहा महिन्यांनंतर लोकांनी विचार केला की चला पाहू तरी काम कोठपर्यंत पोचले आहे. जेव्हा हे लोक तंबूत पोचले तेव्हा त्यांनी पाहिले की फाटक्या कागदांचा ढिगारा पडला आहे. लोकांनी विचारले की हे काय? तर 'इब्नुल मोकफ्फा' म्हणाले की मोठ्या मेहनतीने जेव्हा एक वाक्य बनवितो आणि त्याची तुलना कुरआनशी करतो तेव्हा ते माझे वाक्य तुच्छ दिसते. ते फाडून फेकतो. आता तर पहिले वाक्यसुद्धा तयार झाले नाही.

एका दुसऱ्या कवीने ग्वाही दिली, ''कुरआन ईशग्रंथ आहे.''

इजिप्तमध्ये अरबी भाषेचे एक महान विद्वान होते, त्यांचे नाव 'कामिल गीलानी' होते. ते पक्के मुस्लिम होते. त्यांचे एक मित्र डॉ. फिंगल अमेरिकेत राहत होते. तेसुद्धा अरबीचे मोठे विद्वान होते; परंतु ते इस्लामचे विरोधक होते. दोघांच्या मैत्रीचे कारण अरबी भाषाच होती. एकदा गीलानी अमेरिकेला गेले आणि आपले मित्र डॉ. फिंगल यांच्या घरी उतरले. एके दिवशी डॉ. फिंगल यांनी गीलानींच्या कानात म्हटले, ''काय अजूनसुद्धा तुम्हाला वाटते की कुरआन ईशग्रंथ आहे?'' असे म्हणून डॉ. फिंगल हसले. त्यांना वाटत होते की याचे उत्तर गीलानीजवळ नाही. गीलानी यांनी गंभीरपणे उत्तर दिले की अनुभवाअंती उत्तर दिले जाऊ शकते. डॉ. फिंगल तयार झाले. असे ठरले की 'जहन्नम' (नरक) वर वाक्य बनविले जावे. दोन्ही कागद आणि लेखणी घेऊन बसले. जेव्हा दहा-पंधरा वाक्ये बनविली गेली, तेव्हा डॉ. फिंगल म्हणाले की आता याच्यापेक्षा अधिक चांगले वाक्य काय बनू शकते? तेव्हा गीलानी यांनी गर्वाने डोके वर केले डॉ. फिंगलने विचारले, काय कुरआनमध्ये याच्यापेक्षा अधिक चांगले वाक्य आहे? गीलानी यांनी उत्तर दिले, ''याच्यापेक्षा चांगलेच नव्हे, तर आपण मानव जण त्याच्यासमोर अजाण मुले आहोत, हे तुमच्या लक्षात येईल.'' आणि त्यांनी आयतींचे पठण केले -

''त्या दिवशी की जेव्हा मी (स्वयं ईश्वराने) ''जहन्नमला विचारीन, काय तू पूर्ण भरलीस आणि ती म्हणेल काय अजून काही आहे ?'' (दिव्य कुरआन, ५०: ३०)

हे ऐकून डॉ. फिंगल यांचे तोंड आश्चर्याने उघडेच्या उघडेच राहिले आणि ते उद्‌गारले, ‘‘गीलानी! माझी ग्वाही लिहून घ्या की कुरआन ईशग्रंथ आहे.’’

‘अल्लामा मशरिकी’ पंजाबचे फार मोठे विद्वान होते. रशिया, अमेरिका आणि इंग्लंडसारख्या देशांत भ्रमण करून आले होते. ते लिहितात की ते लंडनमध्ये एके ठिकाणी बसले होते. रविवारचा दिवस होता. थोडा पाऊस येत होता. काय पाहतात की प्रसिद्ध शास्त्रज्ञ ‘सर जेम्स जोन्स’ काखेत छत्री व हातात बायबल घेऊन जात होते. अल्लामा मशरिकी झपझप गेले आणि त्यांच्यासमोर जाऊन उभे राहिले व म्हणाले, ‘‘मी आपल्याला दोन प्रश्न विचारू इच्छितो. प्रश्न पहिला असा की पाऊस पडत आहे आणि आपली छत्री तर काखेत आहे?’’ हे ऐकून त्यांनी स्मितहास्य केले आणि छत्री उघडली आणि त्यांनी विचारले, ‘‘तुमचा दुसरा प्रश्न काय आहे?’’ अल्लामा म्हणाले, ‘‘आपण चर्चला का जात आहात?’’ थोडा वेळ ते शांत राहिले आणि असे म्हणून निघून गेले की ‘‘आज संध्याकाळी चार वाजता माझ्याकडे चहापाण्याला या.’’ जेव्हा अल्लामा संध्याकाळी त्यांच्याकडे गेले तेव्हा जेम्सच्या पत्नीने त्यांचे स्वागत केले. चहाच्या टेबलावर बसताच जेम्सनी आपले म्हणणे सुरू केले. ते म्हणाले, ‘‘जेव्हा चर्चमध्ये मी ईश्वरासमोर नतमस्तक होतो तेव्हा मला मोठी शांती मिळते.’’ अल्लामांच्या प्रश्नाचे हे उत्तर होते. यानंतर अनेक विषयांवर बोलणे होत राहिले. जेम्स अरबी भाषेचे चांगले विद्वान होते. अल्लामांनी त्यांना कुरआनच्या काही आयती ऐकविल्या. त्यापैकी एक आयत या अर्थाची होती -

‘‘वास्तविकता अशी आहे की अल्लाहच्या सेवकांपैकी केवळ ज्ञानी लोकच त्याला भितात.’’ (दिव्य कुरआन, ३५ : २८)

हे ऐकताच जेम्स दचकले आणि म्हणाले की ‘‘ही तर तुम्ही फार मोठी गोष्ट सांगितली. यावर तर मी पन्नास वर्षांपासून मनन करीत आलो आहे; परंतु ही गोष्ट मला समजली नव्हती. काय हे कुरआनमध्ये आहे?’’ अल्लामा म्हणाले, ‘‘होय.’’ यावर जेम्स उद्‌गारले, ‘‘मशरिकी! माझी ग्वाही लिहून घ्या की कुरआन ईशग्रंथ आहे. पैगंबर मुहम्मद (स.) तर अशिक्षित होते. निश्चितपणे हे सत्य ईश्वराने त्यांना सांगितले.’’

ही चौथ्या विद्वानाची साक्ष आहे की ‘‘कुरआन ईशग्रंथ आहे.’’

विज्ञानाची साक्ष

कुरआन विज्ञानाचे पुस्तक नाही की भूगोलाचेसुद्धा नाही. याचा विषय तर मानव आहे. याचे कार्यक्षेत्र मानव आणि त्याचे जीवन आहे. कुरआनमध्ये कुठे कुठे आपली गोष्ट सांगता ओघात ब्रह्मांडाचेसुद्धा थोडेसे वर्णन आले आहे. तेसुद्धा केवळ इतकेच आहे जितके त्या वेळच्या माणसाला समजू शकत होते. दुसरी गोष्ट अशी की विज्ञानाने जे ज्ञान दिले आहे ते अटळही नाही की अंतिमही नाही आणि त्यात निरंतर बदल होत राहतो. उलट कुरआन ईशग्रंथ आहे त्याने प्रस्तुत केलेले ज्ञान आजपर्यंत चुकीचे सिद्ध करता आले नाही.

कुरआन एक विशिष्ट विचार, एक विशिष्ट जीवनमार्ग देऊन एक विशिष्ट प्रकारचा समाज निर्माण करू इच्छितो, कुरआन मानवजातीला मार्गदर्शन करण्याचे काम करतो आणि समाजाचा एक असा नमुना प्रस्तुत करतो जो यापूर्वी कधीही नव्हता, कुरआन एक असा जीवनमार्ग (व्यक्तिगत आणि सामूहिक) जगात स्थापित करतो जसा आजपर्यंत कोठेही स्थापित झालेला नसेल. म्हणून ईश्वराने ब्रह्मांडाचे ज्ञान प्राप्त करण्याचे शोधकार्य मानवासाठी ठेवले आहे.

हे विज्ञानयुग आहे. विज्ञानाद्वारे जी गोष्ट समजाऊन दिली जाते तिचे महत्त्व फारच असते. येथे आम्ही शास्त्रीय दृष्टिकोनाने कुरआन ईशग्रंथ असल्याचे सिद्ध करू.

संपूर्ण जग हे मानत होते की पृथ्वी स्थिर आहे आणि सूर्य तिच्या सभोवती प्रदक्षिणा घालीत आहे. गॅलिलिओ हा पहिला शास्त्रज्ञ होता, ज्याने सिद्ध केले की सूर्य स्थिर आहे आणि त्याच्या सभोवती पृथ्वी प्रदक्षिणा घालीत आहे. हा विचार ख्रिश्चन धर्माविरुद्ध होता. कारण त्यांनी आपल्या ग्रंथात त्या सर्व गोष्टी लिहून ठेवल्या होत्या, ज्यांचे त्यावेळी प्रचलन होते आणि सांगून टाकले होते की या गोष्टी ईश्वराकडून आल्या आहेत. गॅलिलिओच्या या विचाराने त्यांच्या ग्रंथांची प्रतिमा खराब होत होती. म्हणून त्या लोकांनी गॅलिलिओला फाशी दिली.

हा विचार की पृथ्वी स्थिर आहे आणि सूर्य तिच्याभोवती भ्रमण करीत आहे. इतका पुरातन आहे आणि लोकांच्या हृदयात इतका पक्का बसलेला होता की गॅलिलिओचा विचार समोर आल्यानंतरसुद्धा सुशिक्षित जगाला सोडून बाकीचे सर्व लोक आजसुद्धा असे मानतात की पृथ्वी स्थिर आहे आणि सूर्य तिच्याभोवती भ्रमण करीत आहे. लोक म्हणतात की सूर्य उगवला, सूर्य तेथे पोचला, सूर्य मावळला. गॅलिलिओच्या अगोदर तर सुशिक्षित जगतालादेखील हे माहीत होते की पृथ्वी स्थिर

आहे. आज शास्त्र एक पाऊल पुढे गेले आहे आणि ते म्हणते की पृथ्वी सूर्याला प्रदक्षिणा तर घालीत आहेच परंतु आपल्याबरोबर आपल्या सूर्य-मंडळाला घेऊन ताशी वीस मैलाच्या वेगाने एकीकडे पळत जात आहे. सुमारे १५००० वर्षांपूर्वी जगाच्या कोणत्याही माणसाला माहीत नव्हते की पृथ्वी सूर्याभोवती भ्रमण करते आणि सूर्य सर्वांना घेऊन एकीकडे जात आहे. परंतु कुरआनने १५०० वर्षांपूर्वी सांगितले होते

''आणि सूर्य आपल्या गंतव्य स्थानाकडे जात आहे. हा प्रभुत्वशाली सर्वज्ञ सत्तेने ठरविलेला हिशेब आहे.'' (दिव्य कुरआन, ३६ : ३८)

तेव्हा ईश्वराशिवाय इतर कोणालाही ही गोष्ट माहीत नव्हती. म्हणून कुरआन ईशग्रंथ आहे.

इ. सन १६०० ची गोष्ट आहे की तुर्कस्तानचे नौदल सेनापती अली रईस आपल्या 'मियेतुलम ममालिक' नामक पुस्तकात लिहितात की ते आपले नौदल घेऊन इराणच्या आखातात होते. फारच थोडे पिण्याचे पाणी जहाजात उरले होते. इराणच्या आखातातील पाणी खारे आहे आणि चोहों बाजूने वाळवंट आहे. म्हणून पाणी मिळण्याचा मोठा प्रश्न उभा होता. ते पाहून अली रईसला मोठे आश्चर्य वाटले की इराणच्या आखातात खाऱ्या पाण्याच्या मध्यभागी गोड पाण्याचा साठा आहे. परंतु दोन्ही पाणी आपापसात मिसळत नाहीत. जोपर्यंत हे नौदल इराणच्या आखातात होते तोपर्यंत ते या गोड पाण्याचा वापर करीत राहिले. जेव्हा अमेरिकन कंपनी सऊदी अरबस्थानात तेल काढण्यासाठी आली तेव्हा दीर्घ काळपर्यंत ते याच पाण्याचा उपयोग करीत राहिले. इ. सन १६०० च्या पूर्वी जगातील कोणालाही माहीत नव्हते की समुद्राच्या खाऱ्या पाण्यामध्येसुद्धा गोड पाण्याचा साठा असतो. कुरआनने १५०० वर्षांपूर्वी याचे वर्णन केले आहे. कुरआनच्या सूरह रहमानमध्ये म्हटले गेले आहे -

''दोन्ही समुद्रांना सोडून दिले की त्यांनी आपापसात मिसळावे. तथापि त्यांच्या दरम्यान एक पडदा (अडथळा) आहे ज्याला ते ओलांडू शकत नाहीत.''

(दिव्य कुरआन, ५५ : १९-२०)

''तोच आहे ज्याने दोन समुद्रांना जोडून ठेवले आहे. एक चवदार व गोड आणि दुसरा खारट. आणि दोघांच्या दरम्यान एक आवरण आहे (एक बाधा-अडथळा आहे) जो दोघांना आपसांत मिसळू देत नाही.'' (दिव्य कुरआन, २५ : ५३)

इ. सन १६०० पूर्वी हे सत्य ईश्वराव्यतिरिक्त कोणासही माहीत नव्हते. म्हणून आपण म्हणू शकतो की कुरआन ईशग्रंथ आहे.

ही पृथ्वी जिच्यावर आपण सर्वजण वास्तव्य करीत आहोत, ती ताशी एक हजार मैलाच्या वेगाने चेंडूप्रमाणे नाचत आहे आणि त्याचबरोबर ताशी ६६,६०० मैलाच्या वेगाने सूर्याभोवती भ्रमणसुद्धा करीत आहे. तरीसुद्धा ही पृथ्वी किती शांत आहे? कोणतेही कंपन अथवा झटका नाही. याचे काय कारण आहे? कोणासही माहीत नाही. अगदी अलिकडेच एक जर्मन शास्त्रज्ञाने हे सिद्ध केले आहे की पृथ्वीतलावरील शांतता पर्वतामुळे आहे. कुरआनने १५०० वर्षांपूर्वीच ही गोष्ट सांगितली होती की याचे कारण पर्वत आहे. पवित्र कुरआनमध्ये महान अल्लाह सांगतो -

''आणि आम्ही पृथ्वीवर पर्वत रोवले केले जेणेकरून तिने यांना घेऊन कोलमडू नये.'' (दिव्य कुरआन, २१ : ३१)

या शास्त्रज्ञापूर्वी ईश्वराव्यतिरिक्त या सत्याचे कोणासही ज्ञान नव्हते. यावरून सिद्ध होते की कुरआन ईशग्रंथ आहे.

इसवी सनापूर्वी ५००० वर्षांत एका 'आद' नावाच्या जातीचे काही वर्णन लोककथेत आढळते. केवळ इतकेच की अरबस्थानच्या अहकाफ क्षेत्रात 'आद' नामक एक मानवजात राहत असे आणि तिचा नाश असा झाला की पाठीमागे त्या जातीचे चिन्हदेखील उरले नाही. परंतु कुरआनने या जातीवर तीव्र टीका केली आहे. कुरआनमध्ये चोवीस ठिकाणी या जातीचे वर्णन आहे. कुरआन म्हणतो की पैगंबर नूह यांच्या काळातील प्रलयानंतर ही पहिली मानवजात आहे जिची संस्कृती इतकी वैभवशाली होती. त्याच्यासंबंधी कुरआन म्हणतो -

''ही काय तुमची स्थिती आहे की प्रत्येक उंच ठिकाणी व्यर्थ एका स्मृतिभवन निर्माण करता आणि मोठमोठ्या महालांची निर्मिती करता जणू काय तुम्हाला (या जगात) सदैव राहावयाचे आहे.'' (दिव्य कुरआन)

''आदची स्थिती अशी होती की ते पृथ्वीवर कोणत्याही हक्काविना मोठे होऊन बसले आणि म्हणू लागले की कोण आहे आमच्यापेक्षा अधिक शक्तिशाली.''

(दिव्य कुरआन, ४१ : १५)

''तुम्ही पाहिले नाही का की तुमच्या अल्लाहने (प्रभूने) कसा व्यवहार केला उंच खांबवाल्या इरमशी ज्यांच्या समान कोणतीही जात जगातील देशात उत्पन्न केली गेली नव्हती ?'' (दिव्य कुरआन, ८९ : ६-८)

''आणि आद फार जोरदार तुफानी वादळात नष्ट केले गेले. अल्लाहने त्या वादळाला निरंतर सात रात्री आणि आठ दिवसांपर्यंत त्यांच्या पाठीमागे लपवून ठेवले.

(तुम्ही जर तेथे असता तर पाहिले असते). की त्यांना तेथे कशा प्रकारे पछाडले होते. जणू काही ते खजुरीचे पोकळ खोड असावेत. आता त्यांचे पाठीमागे काही उरलेले पाहता का?''
(दिव्य कुरआन, ६९ : ६-८)

परंतु आता पाश्चिमात्य पुरातत्त्व पंडित कुरआनच्या कथनाला का मानू लागले आहेत? फेब्रुवारी १९९२ पूर्वीपर्यंत या जातीच्या वैभवशाली संस्कृतीबद्दल कोणासही काही माहीत नव्हते. फेब्रुवारी १९९२ च्या उत्खननात अहकाफच्या क्षेत्रात एक वैभवशाली इमारत सापडली आहे, ज्यात आठ खांब आहेत-ज्यांचा अर्धव्यास १० फूट आणि उंची ३० फूट आहे. त्यात जी सामग्री प्राप्त झाली आहे, त्यावरून कल्पना केली जाऊ शकते की 'आद' जातीची संस्कृती फार विकसित होती.

या सर्व बाबी ही गोष्ट स्पष्टपणे सिद्ध करतात की 'कुरआन ईशग्रंथ आहे.'

ध्रुवीय बळ (Centripetal Force)

सूर्य आपल्या सूर्यमंडळाच्या ग्रहांना आपल्याकडे ओढत आहे. या शक्तीला ध्रुवीय बळ (Centripetal Force) म्हणतात. सर्व ग्रह सूर्यापासून लांब पलायन करीत आहेत. या शक्तीला अपकेंद्रकीय बळ (Centrifugal Force) म्हणतात. आज हे दोन्ही बळ समान आहेत. म्हणून हे ग्रह सूर्याकडेही जाऊ शकत नाहीत आणि सूर्यापासून लांब पलायनदेखील करू शकत नाहीत. परंतु जेव्हा हिशेब लावला गेला तेव्हा कळले की ग्रहांचे अपकेंद्रकीय बळ सूर्याच्या ध्रुवीय बळापेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा आहे की अजून काही आणखी ग्रह आहेत, जे आम्हाला ज्ञात नाहीत. म्हणून हा फरक पडत आहे. अजूनपर्यंत आठ ग्रहांचा शोध लागला आहे. खगोलशास्त्रज्ञ ग्रहांच्या शोधांत लागले आहेत आणि त्यांनी नवव्या ग्रहाचा शोध लावला ज्याचे नाव कुबेर (Pleto) ठेवले गेले आहे. आता दोन्ही बळांचे अंतर तर कमी झालेले आहे. परंतु ते संपलेले नाही. याचा अर्थ असा आहे की अद्याप काही ग्रह आणखी आहेत. जे आमच्या पकडीत आले नाहीत. इ. सन १९८७ मध्ये चार्लस कोएल याने दहाव्या ग्रहाचा शोध लावलाच. त्याला नाव दिले गेले 'चार्लस कोएल ऑब्जेक्ट'! आता अंतर फारच कमी राहिलेले आहे; परंतु अद्याप बाकी आहे. याचा अर्थ असा आहे की कोणतातरी एखादा ग्रह आणखी आहे. शोध चालू आहे. अजूनपर्यंत अकराव्या ग्रहाचा शोध लागलेला नाही. खगोलशास्त्रज्ञांचा अटळ विश्वास आहे की ग्रह अकरा आहेत. इ. सन १९८७ पूर्वी ग्रहांची एकूण संख्या कोणीही सांगू शकत नव्हता. परंतु कुरआनने पंधराशे वर्षांपूर्वीच सांगितले होते की ग्रहांची संख्या अकरा आहे. पवित्र कुरआनच्या सूरह यूसुफमध्ये आहे-

''ही त्या वेळची गोष्ट आहे जेव्हा यूसुफने आपल्या वडिलांना सांगितले, बाबा, मी स्वप्नात पाहिले आहे की अकरा ग्रह आहेत आणि सूर्य व चंद्र आहे आणि ते मला साष्टांग नमस्कार करीत आहेत.'' (दिव्य कुरआन, १२ : ४)

हे शास्त्रीय पुरावे इतके अटळ आहेत आणि दोन व दोन चारसारखे इतके स्पष्ट आहेत की याला कोणीही नाकारू शकणार नाही. म्हणून विज्ञानाची ग्वाही आहे की 'कुरआन ईशग्रंथ आहे.'

जग हे मान्य करते की ब्रह्मांडाचा निर्माणकर्ता एक आहे. त्याच एक निर्माणकर्त्याला संपूर्ण दुनिया मानते. दुसरी गोष्ट अशी सिद्ध झाली की त्याच निर्माणकर्त्याचा आदेश ग्रंथ 'कुरआन' सर्वांसाठी आलेला आहे. जेव्हा जगाने हे मान्य केले की त्याच एका निर्माणकर्त्याकडून संपूर्ण जगासाठी कुरआन ईशआदेशाच्या रूपात आलेला आहे, तेव्हा हेदेखील पाहावे लागेल की कुरआन कोणता आदेश देतो? कुरआन तर संपूर्ण जीवनासाठी (व्यक्तिगत व सामूहिक) आदेश देतो. जीवनाचे कोणतेही लहान अथवा मोठे असे क्षेत्र नाही की ज्याच्यासाठी त्यात आदेश नसेल.

हा ग्रंथ पहिली गोष्ट अशी सांगतो की या ब्रह्मांडाचा एकच ईश्वर आहे. तोच संपूर्ण ब्रह्मांडाचा एकमेव निर्माता, चालविणारा, शासक, सत्ताधीश सर्व काही तोच आहे. तेथे त्याच्या इच्छा आणि आज्ञेशिवाय पानसुद्धा हालत नाही. तो सर्वत्र आहे आणि सर्वकाही पाहत व ऐकत आहे.

हा ईशग्रंथ कुरआन असे म्हणतो की, या लौकिक जीवनात प्रत्येक माणसाच्या जीवनाचे रेकॉर्ड तयार होत आहे. व्हिडिओ कॅसेटमध्ये केवळ फोटो आणि आवाज टेप होतो; परंतु ईशरेकॉर्डमध्ये हेतु व इच्छासुद्धा टेप होतात.

हा ईशग्रंथ म्हणतो की जीवन फक्त तीन आहेत. एक या जगाचे जीवन जे आम्ही आणि तुम्ही जगत आहोत. याला जग अथवा 'इहलोक' म्हणतात. दुसरे जीवन म्हणजे जेव्हा मनुष्य मरतो, तेव्हा त्याचे शरीर तर येथेच राहते; परंतु त्याचा आत्मा एके ठिकाणी ठेवला जातो, या जागेला 'आलम-ए-बरजख' (पितृलोक) (उर्ध्वलोक व अधोलोकाचा मध्यवर्ती भाग) असे म्हणतात. हे संपूर्ण जग छिन्न-भिन्न केले जाईल आणि सर्व लोक मृत्युमुखी पडतील. याला क़यामत (महाप्रलय) म्हणतात. मग सर्व लोकांना जिवंत केले जाईल आणि शरीरासह त्यांना ईश्वरासमोर हजर केले जाईल. हे आहे 'आखिरत' (परलोक) चे जीवन. फक्त कुरआनच नव्हे तर सर्व ईशग्रंथ केवळ तीन जीवन मानतात. यहुदी (ज्यू) लोकांचा (बायबल) याच तिन्ही जीवनांना मानतो. हिंदू

धर्मियांचा ग्रंथ 'वेद'सुद्धा फक्त तीन जीवनच मानतो. ते तीन जीवन 'इहलोक', 'पितृलोक' व 'परलोक' असे होत. कुरआन म्हणतो की परलोकात मनुष्याच्या भौतिक जीवनाच्या रेकॉर्डची तपासणी होईल. जो कुरआनच्या आज्ञेप्रमाणे जीवन जगेल तोच सफल घोषित केला जाईल आणि त्याला स्वर्गात ठेवले जाईल, जेथे सर्व प्रकारचा आराम आहे. तेथे आजार नाही की म्हातारपण व मृत्यू नाही. परंतु ज्यांचे भौतिक जीवन कुरआनच्या आदेशाविरूद्ध गेले असेल, त्यांना नरकात फेकून दिले जाईल, त्यात नाना प्रकारचे कष्ट आहेत. अग्नि, सर्प, विंचू, यातना व भूक-तहान, तेथे मृत्यूही येणार नाही जेणेकरून कष्टापासून मुक्ती मिळावी.

कुरआनसंबंधी मानव-व्यवहार

या ब्रह्मांडाचा निर्माणकर्ता एक आहे. त्याने आपले अंतिम दूत पैगंबर मुहम्मद (स.) मार्फत आपला अंतिम आदेश-ग्रंथ 'कुरआन' पाठविला आहे. या ग्रंथासंबंधी मानवाचा व्यवहार कसा असला पाहिजे?

या पवित्र ग्रंथासंबंधी एक व्यवहार तर त्या अडाणी मुस्लिमांचा आहे जे या ईशग्रंथाला सुंदर आवरण घालून टांगून ठेवतात, त्याचे चुंबन घेतात. कधी कधी न समजता त्याचे पठण करतात. तेव्हा आजारी पडतात जेंव्हा कुरआनच्या अक्षरांना पाण्यात घोळून पितात. जिन्न व भूत पळविण्यासाठी कुरआनच्या वाक्यांना कागदावर लिहून त्याचा ताईत गळ्यात घालतात. बुद्धीशी या व्यवहाराचा मेळ बसत नाही आणि हा ग्रंथसुद्धा याची आज्ञा व परवानगी देत नाही.

दुसऱ्या प्रकारचा व्यवहार असा आहे की या आदेशांचे पालन केले जावे आणि आपले संपूर्ण जीवन व्यक्तिगत व सामूहिक याचप्रमाणे व्यतीत करावे. या व्यवहाराचा बुद्धीशी मेळ बसतो आणि हा ग्रंथ खुद्द त्याचा आदेशसुद्धा देतो. योग्य व्यवहार तर हाच आहे की मानवाने याच्यासमोर नतमस्तक व्हावे, आत्मसमर्पण करावे. नतमस्तक होणे व आत्मसमर्पण करण्यास अरबी भाषेत 'इस्लाम' असे म्हणतात. मानव जगताला एका मंचावर एकत्रित करणे आणि एक विश्व समाज बनविण्यासाठी ईश्वराने तीन आधार दिले आहेत-(१)एक ईश्वर, (२) एक ईशग्रंथ - 'कुरआन' आणि (३) याच्याशी 'इस्लाम' (आत्मसमर्पण) चा व्यवहार. जी व्यक्ती आपले संपूर्ण जीवन या तिन्ही आधारावर स्थापित करते तिचे दोन्ही जीवन (भौतिक व पारलौकिक) सफल होतात.

युरोपियन समाज

युरोपातील बहुतेक लोक ख्रिश्चन धर्मीय आहेत. ख्रिश्चन धर्मापाशी कोणताही जीवनमार्ग नाही. हा धर्म तर सामूहिकतेच्या विरूद्ध आहे. त्याला तर फक्त व्यक्तीच्या मुक्तीची गरज आहे आणि त्याने मुक्तीचा मार्गसुद्धा ठरवून टाकला आहे.

युरोपवासियांनी जेव्हा भौतिक उन्नतीच्या मार्गावर पाऊल ठेवले आणि विज्ञान व तंत्रशास्त्राच्या क्षेत्रात पुढे सरसावण्याची इच्छा केली तेव्हा ख्रिश्चन धर्म त्यांच्या काय उपयोगी पडणार? उलट त्यांच्या मार्गातील अडसर ठरला. कुणाला विषाचा प्याला पिण्यास भाग पाडले तर कुणाला फाशीवर चढविले, कुणाची जीभ कापली आणि कुणाला जिवंत आगीत फेकून दिले. म्हणून सर्व जनतेला ही बंधने तोडून पुढे जावे लागले.

ही बंधने तोडून पुढे जाताना त्यांच्यासमोर दोन मार्ग होते-

(१) ईशआदेशांच्या आधारे भौतिक उन्नतीच्या मार्गावर पाऊल ठेवावे आणि

(२) ईश्वर व ईशआदेशांना ठोकरून भौतिक उन्नतीच्या क्षेत्रात पाऊल ठेवले जावे.

पहिल्या प्रकाराचा स्वीकार करण्यास ते तयार नव्हते; कारण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रासाठी ईशआदेश केवळ इस्लामजवळ होता आणि मुस्लिमांशी त्यांचे युद्ध झाले होते म्हणून त्यांना दुसराच मार्ग स्वीकारावा लागला.

ईशआदेशाला सोडून जसजसे ते पुढे जात राहिले तसतशी त्यांची मानवता घटत गेली आणि पशुता वाढत गेली. आज आईवडिलांचा संबंध मुलांशी नाही की संततीचा संबंध आपल्या आईवडिलांशी नाही. त्यांचे कौटुंबिक जीवन नष्ट झालेले आहे. मुलांना आईवडिलांचे प्रेम न मिळाल्याने ते हिप्पी, डाकू आणि खुनी बनत आहेत. व्यभिचार इतका वाढला आहे की चौकातील बाके आणि उद्यानेसुद्धा व्यभिचारासाठी कमी पडतात. निर्लज्जपणा असा शिगेस पोचला आहे की नग्न लोकांचा क्लब आहे, जेथे पुरुष व स्त्रिया सर्वच नग्न असतात. एकाच तळ्यात पुरुष व स्त्रिया एकत्र नग्न स्नान करतात. एका पुरुषाची कायदेशीर पत्नी तर असते; परंतु अनेक स्त्रिया त्याच्या पत्नी म्हणून राहतात. एका स्त्रीचा कायदेशीर एक पति तर असतोच; पण अनेक पुरुष तिचे बेकायदेशीर पती असतात. अमेरिकेतील एका शाळेत तारुण्यात न आलेल्या कुमारिकांची तपासणी झाली तर चाळीस टक्के मुली अशा आढळल्या ज्यांनी पुरुषांशी लैंगिक संबंध स्थापित केले होते. मुले आणि मुलींत मादक पदार्थांचा प्रयोग वाढत चालला आहे. सामाजिक बिघाड इतका वाढला आहे की असे वाटते की जर त्यांनी सदाचाराकडे परतावयाचे ठरविले तरी ते अशक्यच आहे.

हिंदू समाज

ख्रिश्चन धर्माप्रमाणेच हिंदू समाजात ईशआदेशांना व्यक्तिगत जीवनापर्यंत सीमित केले गेले आहे. व्यक्तिगत जीवनात ईशआदेश आणि सामूहिक जीवनात मानवी आदेशांचा फॉर्म्युला (Formula) फार जुना झालेला आहे. जग फार पुढे गेलेले आहे. आज वैज्ञानिक युग आहे. ईश्वराला मानण्याचा अर्थ पूर्ण जीवनात ईशआदेशांना मानणे होय. जर असे नसेल तर मग हे एक प्रकारे ईश्वराचा नकार करणे मानले जाईल. जर आपण समजतो की ईश्वर आहे आणि त्याचा आदेश बरोबर आहे तर संपूर्ण जीवनात त्याच्या आदेशांचे पालन केले पाहिजे.

आजच्या वैज्ञानिक युगात मनुष्य ख्रिश्चन धर्माला चांगल्या प्रकारे जाणतो. ही गोष्ट स्पष्टपणे समोर आली आहे की त्याच्याजवळ आपल्या प्रश्नांची उकल नाही. हिंदू व बौद्ध मतांचे तत्त्वज्ञानदेखील या प्रश्नांची सार्थक सोडवणूक प्रस्तुत करीत नाही. माणसा-माणसांत असमानता आढळते. आर्थिक शोषणांचे अत्यंत हीडीस स्वरूप म्हणजे सावकारी व व्याजखोरी आजच्या समाजातले एक अभिन्न अंग बनलेले आहे. आज या समाजातील सामूहिक जीवनाचा नियम माणसा माणसात एकोपा निर्माण करण्याऐवजी अगणित वर्ग, जाती व उपजातीय विभाजित करतो. याचे सामाजिक नियम इतके जुने झाले आहेत की सुशिक्षित हिंदूसुद्धा ते तोडण्यास बाध्य होत आहेत.

आजच्या समाजात कोणते एकसुद्धा असे सूत्र नाही की ज्यांवर सर्वांनी एकमत व्हावे. परिणामस्वरूप असले मुद्दे निर्माण केले जात आहेत, जे सामुदायिक ऐक्यासाठी हानिकारक आहेत. मंदिर-मस्जिद विवाद याच संदर्भात पाहिला जाऊ शकतो. राहिला इस्लाम तर त्याच्यापाशी आमच्या सर्व समस्यांचे समाधान आहे. इस्लाम केवळ एखाद्या विशिष्ट क्षेत्रासाठी नाही तर विश्वाच्या संपूर्ण मानवजातीसाठी आला आहे. तो सर्व मानवांसाठी दया आणि कृपा बनवून पाठविला गेला आहे.

-०- समाप्त -०-